२१ साप्ताहिक समाजसत्ता
www.samajsatta.com
Mo. : 9049940157
RNI No. : MAHMAR2009/28514 www.samajsatta.com
■ वर्षे १६ वे ■ अंक २९ ■ पुणे, सोमवार, दि. २३ मार्च ते २९ मार्च २०२६ ■ मुल्य : २ रु ■ पान ४

## राज्यात गॅस, पेट्रोलसाठी रांगाच रांगा

**मुंबई :** गेल्या काही दिवसांपासून राज्यात सुरू झालले एलपीजी गॅस, पेट्रोलचे संकट काही संपता संपण्याचे नाव घेत नाही. राज्यातील अनेक पेट्रोल पंपांवर (२८ मार्च) आज रोजीही भल्या मोठ्या रांगा दिसल्या. मुंबई, पुण्यासह छत्रपती संभाजीनगरमध्ये तर दोन किलोमीटरच्या रांगा लागल्या होत्या. तर काही ठिकाणी तर थेट मारामा-या होतानाही दिसत आहेत. जालन्यातील पेट्रोल पंपावर एका टोळक्याने थेट पेट्रोल पंप कर्मचा-यांनाच बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे. पेट्रोल दिले नाही म्हणून हा प्रकार घडल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे एकच खळबळ उडाली आहे.

छत्रपती संभाजीनगरमध्ये ऑटो एलपीजी गॅससाठी दोन किलोमीटरच्या रांगा लागल्या आहेत. छत्रपती संभाजीनगरच्या पैठण रस्त्यावरील नक्षत्रवाडी पंपावर ऑटो चालकांची मोठी गर्दी झाली आहे. पहाटे ५ वाजल्यापासूनच ऑटोरिक्षा चालक पंपावर गॅसच्या प्रतीक्षेत रांगेत उभे आहेत. एका दिवसात गॅसचे दर १० रुपयांनी वाढल्याने आता ऑटो एलपीजी गॅस १०० रुपये प्रति लिटरवर गेला आहे. २० दिवसांत ऑटो एलपीजी गॅसचे दर तब्बल ४९ रुपयांनी वाढले आहेत. पहाटे ४ वाजल्यापासून ऑटोरिक्षा चालक पंपासमोर रांगेत उभे आहेत. तर काही रिक्षाचालक पंपावरच मुक्कामी आहेत.

# देशात पेट्रोल पंपांवर मिळणार आता रॉकेल

■ **युद्धामुळे दोन महिने नियमांत सूट**

**नवी दिल्ली :** युद्धामुळे एलपीजीच्या पुरवठ्यासंदर्भात केंद्र सरकार विविध उपाययोजना करीत आहे. या पार्श्वभूमीवर केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक गॅस मंत्रालयाने पेट्रोल पंपांवर केरोसीन म्हणजेच रॉकेलची विक्री करण्यास परवानगी देण्याचा निर्णय घेतला. युद्धामुळे पेट्रोलियम सुरक्षा आणि लायसेंसिंग नियमात सूट देण्यात आली असून, या संदर्भात राजपत्र जारी केले आहे.

केंद्र सरकारच्या या नियमानुसार प्रत्येक जिल्ह्यात सरकारी मालकीच्या तेल मार्केटिंग कंपन्यांच्या दोन पेट्रोल पंपांवर ५ हजार लिटर रॉकेलचा स्टॉक ठेवण्यास परवानगी देण्यात आली आहे. अन्नपदार्थ बनवणे आणि दिव्यांसाठी वापराच्या उद्देशाने



सर्वसामान्यांना रॉकेल विक्री करण्यास परवानगी देण्यात आली आहे. रॉकेलच्या विक्रीला ६० दिवसांची परवानगी देण्यात आली आहे. सरकारी मालकीच्या तेल मार्केटिंग कंपन्यांची संख्या तीन आहे. म्हणजेच एखाद्या तेल मार्केटिंग कंपनीच्या २ पेट्रोल पंपावर रॉकेल मिळेल. एका पेट्रोल पंपावर २५०० लिटर रॉकेलचा साठा करता येईल.

भारत सरकारने गेल्या काही वर्षांत टप्प्याटप्प्याने रॉकेलची विक्री मर्यादित केली होती. २०१५ नंतर उज्वला योजना आणि सौभाग्य योजनेद्वारे एलपीजी आणि वीज कनेक्शन दिले. त्यामुळे रेशन दुकानांमधून अनुदानावर दिले जाणारे रॉकेल टप्प्याटप्प्याने बंद करण्यात आले.

**या राज्यांत रॉकेल विक्रीला परवानगी?**

दिल्ली, चंदीगड, हरियाणा, पंजाब, दादरा नगर हवेली, दमन आणि दीव, पाँडिचेरी, आंध्र प्रदेश, अंदमान निकोबार, राजस्थान, उत्तर प्रदेश, गोवा, गुजरात, उत्तराखंड, लक्षद्वीप, जम्मू आणि काश्मीर, लडाख, तेलंगणा, हिमाचल प्रदेश, नागालँड, मध्य प्रदेश, सिक्कीम

## अमेरिका, युरोपीय देशांत 'नो किंग्स' मोहीम

**वॉशिंग्टन :** इराणविरोधात युद्ध पुकारल्याने जगभरातील देशांना याचा त्रास सहन करावा लागतोय. परिणामी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याविरोधात रोष वाढत गेल्याचे चित्र निर्माण झाले आहे. तसेच, त्यांच्या विविध धोरणांविरोधात शनिवारपासून अमेरिका आणि युरोपमध्ये 'नो किंग्स' रॅलींच्या माध्यमातून लाखो लोकांनी निदर्शने केली. या आंदोलनाचे मुख्य केंद्र मिनेसोटा होते. सेंट पॉल येथील मिनेसोटा कॅपिटलच्या मैदानावर आणि आसपासच्या रस्त्यांवर हजारो लोक खांद्याला खांदा लावून उभे होते. काहींनी अमेरिकेचे झेंडे उलटे धरले होते, जे ऐतिहासिकदृष्ट्या संकटाचे लक्षण मानले जाते.

या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण प्रसिद्ध गायक ब्रूस स्प्रिंगस्टीन होते. त्यांनी 'स्ट्रीट्स ऑफ मिनीपोलिस' हे गाणे सादर केले. फेडरल एजंट्सनी केलेल्या रेनी गुड आणि ॲलेक्स प्रेटी यांच्या हत्येच्या निषेधार्थ आणि ट्रम्प प्रशासनाच्या आक्रमक इमिग्रेशन धोरणांविरुद्ध रस्त्यावर उतरलेल्या मिनेसोटावासीयांच्या सन्मानार्थ त्यांनी हे गाणे लिहिले होते. स्प्रिंगस्टीन म्हणाले, तुमच्या जिद्दीने हे सिद्ध केले आहे की ही अजूनही अमेरिकाच आहे आणि हे भयानक स्वप्न फारवेळ टिकणार नाही.

तर, वॉशिंग्टन डीसीमध्ये शेकडो लोकांनी लिंकन मेमोरिअलसमोरून नॅशनल मॉलपर्यंत मोर्चा काढला. त्यांच्या हातात 'विदुषका, राजमुकुट खाली ठेव' , असे लिहिलेले फलक होते. तसेच 'राजा नको' अशा घोषणाही त्यांनी दिल्या.

न्यूयॉर्क शहरापासून ते आयडाहोमधील ड्रिग्ससारख्या छोट्या शहरांपर्यंत ही निदर्शने पसरली. आयोजकांच्या मते, ५० राज्यांमध्ये ३,१०० हून अधिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. सुमारे ९० लाख लोक यात सहभागी झाले असल्याचा अंदाज आहे. सॅन दिएगो येथे सुमारे ४०,००० लोकांनी मोर्चा काढला. आंतरराष्ट्रीय स्तरावर लंडन, पॅरिस आणि रोममध्येही निदर्शने झाली. रोममध्ये हजारो लोकांनी पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांच्या विरोधात आणि इराणवरील हल्ल्यांच्या निषेधार्थ घोषणाबाजी केली.

या युद्धाचे नेतृत्व करणा-या इस्रायलमध्ये सुद्धा इराण युद्ध तात्काळ थांबवण्याच्या मागणीसाठी लाखो लोक रस्त्यावर उतरले. इस्रायलची राजधानी तेल अविवमध्ये लाखो लोकांनी सरकारविरोधात नारेबाजी केली. नेतन्याहू यांनी युद्ध थांबवावे. देशात या युद्धाचे परिणाम होत असून महागाई भडकल्याचे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे. सततच्या युद्धामुळे इस्रायलची जनताही विटली आहे. यावेळी आंदोलनात 'नो वॉर'चे पोस्टर झळकले. त्यामुळे इराण युद्ध हे ट्रम्प आणि नेतन्याहू यांनी लादल्याचे या आंदोलनातून समोर येत असल्याचे राजकीय विश्लेषकांचे म्हणणे आहे.

व्हाईट हाऊसच्या प्रवक्त्या अबीगेल जॅक्सन यांनी या निदर्शनांना 'डाव्या विचारसरणीच्या नेटवर्कचे उत्पादन' संबोधले आणि याला जनतेचा खरा पाठिंबा नसल्याचे म्हटले. नॅशनल रिपब्लिकन काँग्रेस कमिटीनेही याला 'हेट अमेरिका रॅलीज'म्हणत टीका केली.

प्रदर्शकांकडे मागण्यांची मोठी यादी होती. प्रामुख्याने इराणमधील युद्ध थांबवणे, ट्रम्प यांचे इमिग्रेशन धोरण आणि ट्रान्सजेंडर हक्कांची कपात या मुद्यांचा या यादीत समावेश होता.

### नेपाळचे माजी पंतप्रधान के. पी. शर्मा ओली यांना अटक

**काठमांडू :** नेपाळचे माजी पंतप्रधान के. पी. शर्मा ओली यांना अटक करण्यात आली आहे. बालेन शाह यांनी पंतप्रधान होताच मोठी कारवाई केली आहे. शाह यांनी सत्ता स्थापन करताच विरोधकांवर कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. पंतप्रधान बालेन शाह यांनी कॅबिनेट बैठकीत माजी पंतप्रधान ओली आणि माजी गृहमंत्री रमेश लेखक यांना अटक करण्याचे आदेश दिले होते. आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांच्या मृत्यूप्रकरणी अटक करण्यात आली आहे. दोघांना अटक झाल्याने नेपाळच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. माजी पंतप्रधान आणि माजी गृहमंत्र्यांना अटक केल्याने नेपाळचे राजकारण तापले आहे. बालेन शाह यांनी सत्तेत विराजमान होताच कठोर पावले उचलणार असल्याचे आधीच स्पष्ट केले होते. त्यानुसार कारवाईचा धडाका सुरू केला आहे. बालेन शाह सरकारने आंदोलनात झालेल्या विद्यार्थ्यांच्या मृत्यू प्रकरणात माजी पंतप्रधानांना अटक केली आहे. बालेन शाह यांनी कॅबिनेटची बैठक बोलावली होती. या बैठकीत तपासाचा अहवाल सादर करण्यात आला होता.

## युद्ध सुरु असताना रशिया पूर संकटात; ३ लाख लोक अडकले

**मॉस्को :** आखाती प्रदेशात सुरू असलेल्या युद्धामुळे संपूर्ण जगाची झोप उडाली आहे, त्याचबरोबर रशियादेखील युक्रेनसोबतच्या युद्धात व्यस्त आहे. अशातच आता रशियावर निसर्गाची अवकृपा पहायला मिळत आहे. युक्रेन युद्धात अनेक वर्षे अडकलेल्या रशियावर आता नवीन संकट कोसळले आहे. देशाच्या काही भागात पूरस्थिती निर्माण झाली असून अनेक ठिकाणी वीजपुरवठाही पूर्णपणे खंडित झाला आहे. त्यामुळे पुतिन सरकारची डोकेदुखी वाढली आहे, सरकारला काही भागात आणीबाणी जाहीर करावी लागली आहे.

समोर आलेल्या माहितीनुसार, दक्षिण रशियातील दागेस्तान प्रदेशात मुसळधार पाऊस आणि पुरामुळे जनजीवन मोठ्या प्रमाणावर विस्कळीत झाले आहे. या प्रदेशाची राजधानी माखाचकला येथे परिस्थिती बिघडल्याने प्रशासनाने आणीबाणी जाहीर केली आहे. सतत होत असलेल्या मुसळधार पावसामुळे अनेक भागांमध्ये पाणी साचले असून मोठ्या प्रमाणावर वीजपुरवठा खंडित झाला आहे. आपत्कालीन सेवांना अलर्टवर ठेवण्यात आले आहे, प्रभावित लोकांना मदत करण्यासाठी बचाव आणि मदतकार्य वेगाने सुरू आहे.

खराब हवामानामुळे २.८३ लाखांहून अधिक लोकसंख्या असलेल्या २८३ वस्त्यांमध्ये वीजपुरवठा खंडित झाला आहे. एकूण ३.२७ लाखांहून अधिक लोक वीज संकटाचा सामना करत आहेत. वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे पिण्याचे पाणी, संपर्क व्यवस्था आणि इतर मूलभूत सेवांमध्येही अडचणी निर्माण झाल्या आहेत.

मुसळधार पावसामुळे आणि पुरामुळे खासाव्युर्तमध्ये पायाभूत सुविधांचेही नुकसान झाले आहे. मुसळधार पावसामुळे एका रेल्वे पुलाचे मोठे नुकसान झाले आहे, त्यामुळे रेल्वे वाहतूक प्रभावित झाली आहे.

# उरुळी कांचनमध्ये श्री राम नवमी निमित्त भव्य आणि शिस्तबद्ध शोभायात्रा - भक्तिरसात न्हाऊन निघाले गाव

**उरुळी कांचन : प्रतिनिधी (सुनील तुपे)**

उरुळी कांचन (ता. हवेली) येथे प्रभू श्री राम नवमी निमित्त आयोजित करण्यात आलेल्या भव्य शोभायात्रा आणि श्री राम पादुका दर्शन यात्रेला यंदा अभूतपूर्व असा प्रतिसाद मिळाला. हजारोंच्या संख्येने ग्रामस्थ, महिला, लहान मुले आणि युवकांनी उत्साहाने व भक्तिभावाने सहभाग घेत संपूर्ण गाव भक्तिरसात रंगून गेले.



ढोल-ताशांचा गजर, भगव्या पताकांची उंच उभारणी आणि जय श्री रामच्या घोषणांनी वातावरण दुमदुमून गेले होते. शोभायात्रेत प्रभू श्री रामांची आकर्षक मूर्ती तसेच पवित्र पादुकांचे दर्शन घेण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. अनेकांनी कुटुंबासह उपस्थित राहून या धार्मिक सोहळ्याचा आनंद घेतला.

विशेष म्हणजे, एवढ्या मोठ्या गर्दीतही कुठलाही गोंधळ किंवा अनुशासनभंग न होता संपूर्ण कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पार पडला. गावातील नागरिकांची एकजूट, सामाजिक बांधिलकी आणि धार्मिक भावना यांचे उत्कृष्ट उदाहरण या शोभायात्रेतून पाहायला मिळाले.

या भव्य सोहळ्याच्या यशामागे गावातील तरुण कार्यकर्त्यांचे अथक परिश्रम मोलाचे ठरले. कोणतीही प्रसिद्धी किंवा दिखावा न करता, अनेक वर्षांपासून हे कार्यकर्ते नियोजन, व्यवस्थापन, खर्च नियंत्रण आणि मिरवणुकीची आखणी या सर्व बाबी अत्यंत जबाबदारीने सांभाळत आहेत. त्यांच्या मेहनतीमुळेच हा उत्सव दरवर्षी अधिक भव्य, आकर्षक आणि शिस्तबद्ध होत आहे.

शोभायात्रेदरम्यान ठिकठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, वैद्यकीय मदत, तसेच स्वयंसेवकांच्या माध्यमातून गर्दी नियंत्रणाचे उत्तम नियोजन करण्यात आले होते. त्यामुळे सर्वच नागरिकांनी सुरक्षित आणि आनंददायी वातावरणात या सोहळ्याचा अनुभव घेतला.

उरुळी कांचनमधील हा उत्सव केवळ धार्मिक कार्यक्रम न राहता, सामाजिक एकात्मता, संस्कृती आणि श्रद्धेचा भव्य संगम ठरला. गावकऱ्यांनी दाखवलेली शिस्त आणि उत्साह यामुळे हा सोहळा इतरांसाठी आदर्श ठरावा असा संदेशही यावेळी दिला गेला.

## संपादकीय

# पीएनजीचा ऑपशन

आखाती देशातील युद्धाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रासह देशात एलपीजी गॅसचा प्रचंड तुटवडा निर्माण झाला आहे. त्यातच राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांच्या एका वक्तव्यामुळे सर्वसामान्यांची चिंता वाढली आहे. तीन महिन्यांनंतर कदाचित एलपीजी गॅसचा पुरवठा बंद होऊ शकतो असे भुजबळ म्हणाले. शनिवारी दिल्ली येथे आयोजित केंद्र सरकारच्या बैठकीनंतर ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते. यावेळी भुजबळ यांनी एलपीजी गॅसचा पुरवठा बंद करण्याबाबत केंद्र सरकारच्या पत्रकाचा उल्लेख करत राज्यातील पीएनजी गॅसच्या जोडण्या वाढवण्याची गरज व्यक्त केली. देशातील निवासी आणि व्यावसायिक आस्थापनांना एलपीजी गॅसचा पुरवठा सुलभपणे कसा करता येईल, त्यात कोणत्या अडचणी आहेत, याचा आढावा घेण्यासाठी दिल्लीत सर्व राज्यांच्या सचिवांना आणि अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांना बोलावण्यात आले होते. या बैठकीला केंद्रीय मंत्री मनोहरलाल खट्टर, पेट्रोलियम मंत्री हरदीप पुरी, केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी उपस्थित होते. प्रत्येक राज्याचे मंत्री आणि सचिवांनी या बैठकीत काही सूचना केल्या. भुजबळ म्हणाले, आम्ही केंद्र सरकारला सांगितले की, पीएनजी गॅस सध्या स्वस्त पडत आहे. त्याचा जास्तीत जास्त उपयोग झाला पाहिजे. केंद्र सरकारच्या एका पत्रकात तीन महिन्यांनी कदाचित एलपीजी बंद होईल, असा उल्लेख होता. त्यामुळे आपण पीएनजीच्या जास्तीत जास्त जोडण्या करून घेतल्या पाहिजेत. जिथे जिथे या संदर्भात काम करणे शक्य आहे तिथे सुरू केले पाहिजे.

सगळ्या नगरपालिकांनी पीएनजीच्या जोडण्या वाढवल्या पाहिजेत. पाण्याचे आणि विजेचे कनेक्शन असल्यावरच इमारतींना ओसी दिला जातो, त्याप्रमाणेच आता पीएनजी कनेक्शनच्या सक्तीची अट टाकली पाहिजे. पीएनजी जोडण्या लवकर करायच्या आहेत. पाईपलाईन टाकण्यासाठी विविध भागात परवानग्या मागितल्या जातात. या परवानग्या २४ तासांत दिल्या जातील. पीएनजीचे काम करणा-यांना २४ तास परवानगी राहील असेही भुजबळ म्हणाले. दुसरीकडे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणतात, देशात पुरेसा इंधन साठा आहे, अफवा पसरवाल तर तात्काळ फौजदारी कारवाई केली जाईल. मग दोन मंत्र्यांच्या वक्तव्यात विरोधाभास कसा असा प्रश्न सर्वसामान्यांना पडतो. देशात पेट्रोल-डिझेलचा तुटवडा आणि लॉकडाऊन लागण्याच्या अफवांना केंद्र सरकारने शुक्रवारी पूर्णविराम दिला. देशात कोणत्याही प्रकारचे लॉकडाऊन लागू केले जाणार नाही. तसेच इंधनाचा अजिबात तुटवडा नाही. त्यामुळे जनतेने घाबरून जाण्याचे कारण नाही, असे स्पष्ट करत केंद्रीय संसदीय कामकाजमंत्री किरेन रिजिजू यांनी राज्यांना साठेबाजी रोखत इंधन पुरवठा सुरळीत ठेवण्याचे आवाहन केले.

त्याचबरोबर पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्कात केलेल्या कपातीच्या धाडसी निर्णयाबद्दल त्यांनी पंतप्रधान मोदींचे तोंडभरून अभिनंदन केले. अशाच प्रकारचे अभिनंदन मुख्यमंत्री फडणवीस यांनीही केले आहे. पेट्रोल-डिझेलवरील उत्पादन शुल्क कमी केल्याबद्दल त्यांनी पंतप्रधानांचे आभार मानले आहेत. इंधनाचा तुटवडा अजिबात नाही असा सरकारचा दावा आहे. अफवा पसरवून जर कुणी गोंधळाची स्थिती निर्माण करत असेल तर ते देशविरोधी काम आहे असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले, आपल्या देशाच्या डिप्लोमॅटिक रिलेशनशीपमुळे, पंतप्रधानांच्या नीतीमुळे इंधनाचा तुटवडा निर्माण होणार नाही याची काळजी घेतली जात आहे. शहरांमध्ये महानगरच्या माध्यमातून पीएनजी गॅस पोहोचवण्यासाठी प्रयत्न केला जात आहे.

त्यासंबंधी सरकारने एक आदेश काढला आहे. शहरांवरील एलपीजीचा लोड कमी करून पीएनजीवर भर दिला जाणार आहे. पीएनजीमुळे एलपीजीची भविष्यात समस्या किंवा अडचण येणार नाही. आजूबाजूच्या देशांत लॉकडाऊन सुरू असताना आपल्या देशात मात्र कोणताही नकारात्मक परिणाम झाला नाही. जरी तेलाच्या किमती वाढल्या असल्या तरी त्याचा परिणाम सामान्य ग्राहकांवर पडू दिला नाही. एलपीजी गॅसचा कुठेही तुटवडा नाही. मुख्यमंत्र्यांनी ठामपणे हे वक्तव्य केले असले तरी आपल्या राज्यापुरते बोलायचे झाल्यास अनेक ठिकाणी गॅस खरेदीसाठी एजन्सीबाहेर रांगा लागल्याचे चित्र दररोज दिसते. कदाचित सरकारच्या नजरेत ते येत नसावे! जागतिक आव्हानांचा सामना करण्यासाठी नागरिकांनी समर्पण आणि ऐक्याने काम करावे असे आवाहन पंतप्रधान मोदींनी केले आहे. 'विकसित भारता'चे ध्येय साध्य करण्यासाठी देशातील जनतेच्या सामूहिक प्रयत्नांची गरज आहे असे ते म्हणाले. युद्धग्रस्त प्रदेशातील कच्चे तेल आणि वायूवर भारत अवलंबून आहे. पण शेतकरी आणि कुटुंबावर याचा बोजा पडणार नाही याची खबरदारी सरकार घेत आहे. भारत सध्या जगातील नैसर्गिक वायूचा चौथा सर्वांत मोठा आयातदार देश आहे. मात्र, आखाती देशात सुरू असलेल्या युद्धामुळे भारताचा गॅस पुरवठा धोक्यात आला आहे.

विशेषत: होर्मुझची सामुद्रधुनी युद्धामुळे विस्कळीत झाल्याने भारताच्या चिंतेत भर पडली आहे. भारताचा गॅस पुरवठा दोन मुख्य मार्गाने होतो. १) भारत आपल्या एकूण गरजेच्या निम्मा गॅस स्वत: उत्पादित करतो. यात पूर्व किनारपट्टीवरील कृष्णा-गोदावरी बेसिनचा मोठा वाटा आहे. याशिवाय आसाम, त्रिपुरा आणि मुंबई हाय येथूनही गॅस मिळवला जातो. ओएनजीसी व रिलायन्स यासारख्या कंपन्या प्रमुख उत्पादक आहेत. २) उर्वरित ५० टक्के गॅस हा कतार, अमेरिका, संयुक्त अरब अमिराती आणि ओमान या देशांकडून एलएनजी स्वरूपात जहाजाद्वारे आयात केला जातो. हा गॅस गुजरातमधील दाहेज, हाजीरा आणि महाराष्ट्रातील दाभोळ येथील टर्मिनल्सवर उतरवून पाईपद्वारे शहरात पाठवला जातो. सध्याच्या परिस्थितीत पाईप्ड गॅस (पीएनजी) पूर्णपणे बंद होण्याची शक्यता कमी आहे. शहरी गॅस वितरकांकडे साधारणपणे १५ ते ३० दिवसांचा राखीव साठा असतो. सरकार घरगुती वापराच्या पाईप्ड गॅसला सर्वोच्च प्राधान्य देते. जर तुटवडा निर्माण झाला, तर सर्वांत आधी सीएनजी गाड्यांच्या आणि खत कारखान्यांच्या पुरवठ्यात कपात केली जाईल. एलपीजीची स्थिती पाईप्ड गॅसपेक्षा अधिक नाजूक आहे.

# आदमी हूँ आदमीसे प्यार करता हूँ!

राज्यात भोंदूबाबा अशोक खरातचे लैंगिक शोषणाचे प्रकरण गाजत असताना, त्यात आणखी एका प्रकरणाची भर पडली आहे. राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते नरहरी झिरवाळ यांच्याशी संबंधित एक कथित आक्षेपार्ह व्हीडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणामुळे झिरवाळ यांच्यावर नैतिकतेचे प्रश्न उपस्थित होत असून विरोधकांकडून त्यांच्या राजीनाम्याची मागणी जोर धरू लागली आहे. संबंधित व्हीडीओ सात महिन्यांपूर्वीचा असल्याचे सांगितले जात आहे. या व्हीडीओमध्ये झिरवाळ एका तृतीयपंथी व्यक्तीसोबत शासकीय निवासस्थानी दिसत असल्याचा दावा केला जात आहे. खोलीत मद्य व खाद्यपदार्थही दिसत असल्याची चर्चा आहे. मात्र या व्हीडीओची अधिकृत पुष्टी अद्याप झालेली नसून, त्यातील दाव्यांची सत्यता तपासली जाणे आवश्यक आहे. या व्हीडीओत दिसणा-या व्यक्तीबाबतही काही दावे समोर आले आहेत. संबंधित व्यक्तीवर कुरार पोलिस ठाण्यात खंडणीचा गुन्हा दाखल असल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे एका जबाबदार मंत्र्यांच्या शासकीय निवासस्थानी अशा प्रकारच्या व्यक्तीची उपस्थिती आणि त्या संदर्भातील आरोपांमुळे नैतिकतेचा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

झिरवाळ यांचा व्हीडीओ हे महाराष्ट्राच्या राजकारणातील नैतिक अध:पतनाचे ज्वलंत उदाहरण आहे. सरकारने या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन त्यांची तात्काळ हकालपट्टी करावी, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी गुरुवारी केली, तर हा प्रकार महायुतीतील पक्षांमधील आपसातल्या गँगवॉरचा आहे की काय, अशी शंका विजय वडेट्टीवार यांनी व्यक्त केली. यातील व्यक्तीच्या जवळच्या मंडळींनी ब्लॅकमेलिंगच्या हेतूने हा प्रकार उघड केला आहे की काय, असाही संशय त्यांनी नोंदवला. गेल्या महिन्यात, आपल्या कार्यालयातील सहायकाला लाच घेताना पकडण्यात आल्याने झिरवाळ वादाच्या भोव-यात सापडले होते. मात्र त्याच्याशी आपला काहीही संबंध नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले होते. झिरवाळ यांच्या शासकीय निवासस्थानी ते तृतीयपंथी महिलेसोबत दिसून येत असल्याचे व्हीडीओ समाज माध्यमात व्हायरल झाल्यानंतर या संदर्भात आपली भूमिका मांडताना आमदार रोहित पवार म्हणाले, व्हीडीओत दिसणारे सर्वजण १८ वर्षांपेक्षा जास्त आहेत. ते सज्ञान आहेत. त्यामुळे कोणाची तक्रार नसेल तर त्यावर राजकीय बोलणं उचित नाही.

मात्र, महिलेची तक्रार असल्यास झिरवाळ यांना सोडायचे नाही. महिलेने पोलिसांकडे तक्रार दिली आहे की नाही ते पहावे लागेल. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया म्हणाल्या, झिरवाळ तृतीयपंथी व्यक्तीला एकदाच भेटले असे नाही, तर त्यांचे असंख्य फोटो आहेत. हे जे पवन यादव आहेत ते प्रत्येकाला भेटायचे. सगळ्या राजकारण्यांबरोबर त्यांचे नेहमीप्रमाणे फोटो आहेत. काही लोक म्हणताहेत की जे झालं ते दोघांच्या मान्यतेनं झालं. हे सगळं शासकीय जागेत केलं गेलं. तिथे दारूच्या बाटल्या दिसत आहेत. हे व्हीडीओ शूटिंग ब्लॅकमेलिंगसाठी केलं गेलं यात शंका नाही. पण आपण करतोय काय याचे भान असणे गरजेचे होते. हे सगळं बघून राजकारण आपण कोणत्या स्थितीला नेतोय याचा महाराष्ट्राने विचार करायला हवा. ही जी घाण चाललीय ती कुठेतरी थांबायला हवी. असे नेते ज्या पक्षात आहेत त्यांच्यासाठी ते लाजीरवाणेच आहे. अशा नेत्यांना तात्काळ राजीनामा द्यायला भाग पाडलं पाहिजे आणि त्यांनी तो दिला नाही तर त्यांना काढून टाकलं पाहिजे. झिरवाळ यांचा व्हीडीओ पवन यादव याचा भाऊ रवी यादव याने सार्वजनिक केल्याचे सांगितले जाते.

पवन यादव हा ट्रान्सवूमन असून खंडणी गोळा करण्याचा व्यवसाय करत असल्याचा भावाचा आरोप आहे. पवन यादव याच्याशी संबंधित प्रकरणात इतर काही मंत्र्यांची नावे देखील पुढे येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची व्याप्ती वाढण्याची चिन्हे दिसत आहेत. संविधानिक पदावर असलेल्या व्यक्तींनी अशा प्रकारे शासकीय सुविधांचा गैरवापर केल्याचा आरोप गंभीर मानला जात आहे. झिरवाळ यांचा आक्षेपार्ह व्हीडीओ सोशल मीडियावर व्हायरल होणे ही केवळ एक घटना नसून, महाराष्ट्राच्या राजकारणातील नैतिक अध:पतनाचे ज्वलंत उदाहरण आहे. भोंदू बाबांबरोबर काही लोकांचे जे धार्मिक कनेक्शन होते ते समोर येत आहे असे लक्षात येताच सहा-सात महिन्यांपूर्वी काढून ठेवलेला व्हीडीओ अचानक बाहेर आणला गेला असावा असे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी म्हणाले. राज्याच्या उपमुख्यमंत्रिपदी व राष्ट्रीय अध्यक्षपदी सुनेत्रा वहिनींची निवड व्हावी ही इच्छा व्यक्त करणारी पहिली व्यक्ती म्हणजे झिरवाळ.

त्यानंतर त्यांच्या ऑफिसमध्ये एसीबीचा ट्रॅप लावणे व नंतर त्यांचा जुना व्हीडीओ काढून मीडियाला सोपवणे म्हणजे एका सरळ माणसाला बदनाम करण्याचे हे षडयंत्र आहे. हे झारीतील शुक्राचार्य कोण आहेत त्याचा छडा लावला पाहिजे असेही मिटकरी म्हणाले. अशोक खरात प्रकरण अंगलट येतंय म्हणून स्वत:वरील लक्ष विचलित करण्यासाठी केलेला हा प्रकार आहे. एकूण हे वंगाळ राजकारण आहे! झिरवाळ यांनी मंगळवारी मुख्यमंत्र्यांची आणि पक्षश्रेष्ठींची भेट घेऊन चर्चा केल्याचे वृत्त आहे. पक्षात सध्या मंत्रिपदासाठी अनेकजण इच्छुक असून, त्या स्पर्धेतूनच झिरवाळ यांना लक्ष्य केले जात असल्याची चर्चा राजकीय गोटात रंगू लागली आहे. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसचे विलीनीकरण करण्याबाबत वरिष्ठ पातळीवर हालचाली सुरू असल्याचे झिरवाळ जाहीरपणे म्हणाले होते. मात्र, आता ही चित्रफीत समोर आल्यानंतर झिरवाळ यांच्यापुढील अडचणी वाढल्या आहेत. या प्रकरणात झिरवाळ यांना राजीनामा द्यावा लागला तर धनंजय मुंडे आणि माणिकराव कोकाटे यांच्यानंतर मंत्रिपद सोडावे लागणारे झिरवाळ हे पक्षाचे तिसरे मंत्री ठरतील.

दोन महिन्यांपूर्वी झिरवाळ यांच्या कार्यालयातील एका लिपिकाला ३५ हजार रुपयांची लाच घेताना एसीबीने रंगेहाथ पकडले होते. त्यावेळी विरोधकांनी झिरवाळ यांच्या राजीनाम्याची मागणी लावून धरली होती. आता ही नवीन चित्रफीत समोर आल्याने विरोधकांच्या हाती आयते कोलित मिळाले आहे. खरे म्हणजे झिरवाळ यांच्या वैयक्तिक बाबीत नाक खुपसण्याची काहीच गरज नव्हती. विशेष म्हणजे या प्रकरणात त्या तृतीयपंथीने तक्रार केल्याचे ऐकिवात नाही. त्यामुळे झिरवाळांच्या खासगी गोष्टीत धुडगूस घालण्याचे काय कारण? येथे सिने अभिनेता मनोज कुमार ऊर्फ भारत कुमारचे एक गीत आठवते- 'बस यही अपराध मै हरबार करता हूँ आदमी हूँ आदमीसे प्यार करता हूँ!' झिरवाळांची कदाचित हीच भावना असेल.

# मध्यस्थीसाठी विलंब का?

आखाती प्रदेशात उद्भवलेल्या अमेरिका-इस्रायल विरुद्ध इराण युद्धामुळे भारतासह इतर अनेक देशांत इंधन आणि नैसर्गिक वायू पुरवठ्याची साखळी कमालीच्या संकटात सापडली. सामान्य लोक गॅस सिलिंडरसाठी रांगेत ताटकळताना दिसले. मात्र केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री इंधनाबाबत काळजी करू नये असे सांगत आहेत हा विरोधाभास नव्हे काय? भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी भारतीय जनतेला या आव्हानात्मक परिस्थितीचा सामना धैर्य दाखवून करण्यासाठी सांगत आहेत. शांततेचा नेहमीच पुरस्कार करणा-या भारताने युद्ध थांबवण्यासाठी मध्यस्थी करावी अशी अपेक्षा अनेक देशांच्या प्रमुखांनी बोलून दाखवली आहे. अमेरिकेच्या अध्यक्षांनी युद्ध पाच दिवसांसाठी थांबवण्याचा निर्णय घेतला. या परिस्थितीचा फायदा घेऊन इराणच्या विरोधातील युद्ध संपुष्टात आणण्यासाठी पाकिस्तानने मध्यस्थी करण्यासाठी संधिसाधूपणा दाखवला. पश्चिम आशियातील युद्ध पाकिस्तानसारख्या आपल्या शत्रूराष्ट्राने केलेल्या मध्यस्थीने थांबले तर त्याचे श्रेय पाकिस्तानला देण्याची तत्परता ट्रम्प दाखवतील यात शंका नाही. नाही तरी डोनाल्ड ट्रम्प भारताचे महत्त्व डावलण्याचा नेहमीच प्रयत्न करतात. भारताने युद्ध थांबवण्यासाठी मुत्सद्देगिरी दाखवण्यात विलंब का केला असा प्रश्न पडतो. कारण आता भारतीय पंतप्रधानांना जाग येताना दिसतेय. पश्चिम आशियातील युद्धाचा फटका सर्वांनाच बसत असल्याने ते लवकरात लवकर थांबायला हवे असा संदेश पंतप्रधान मोदींनी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना दिला आहे म्हणे.

बुधवारी संसदेत आयोजित सर्वपक्षीय बैठकीत केंद्र सरकारने ही माहिती दिली. युद्धात पाकिस्तानच्या मध्यस्थीच्या भूमिकेचा संदर्भ देताना सरकारने, आम्ही पाकिस्तानसारखे 'दलाल' राष्ट्र नाही, अशा कडक शब्दांत शेजारील देशावर टीका केली. या युद्ध स्थितीत पाकिस्तान मध्यस्थीचे जे प्रयत्न करत आहे त्यात काहीही नवीन नाही. १९८१ पासून अमेरिकेने पाकिस्तानचा अशा कामासाठी वापर केला आहे, असे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी बैठकीत सांगितल्याचे सूत्रांनी म्हटले आहे. पश्चिम आशियातील संकटावर भारत गप्प असल्याचा आरोप विरोधी पक्षांनी केला होता. मात्र, सरकारने हा दावा फेटाळून लावत 'आम्ही परिस्थितीवर सतत भाष्य करत आहोत आणि प्रतिसादही देत आहोत' असे स्पष्ट केले. इराणच्या सर्वोच्च नेत्याच्या निधनावर भारताने शोक व्यक्त करण्यास उशीर केला आणि 'नैतिक कमजोरी' दाखवली, असा आरोपही विरोधकांनी केला. यावर उत्तर देताना सरकारने सांगितले की, इराणी दूतावास उघडल्यानंतर परराष्ट्र सचिवांनी तात्काळ तिथे भेट देऊन शोकपुस्तिकेवर स्वाक्षरी केली होती.

बैठकीत सरकारने स्पष्ट केले की, सध्या सरकारचे मुख्य प्राधान्य आखाती देशांमध्ये राहणा-या भारतीय समुदायाची सुरक्षा सुनिश्चित करणे आणि देशाची ऊर्जेची गरज पूर्ण करणे हे आहे. या दोन्ही आघाड्यांवर सरकार आतापर्यंत यशस्वी ठरल्याचेही सांगण्यात आले. दुसरीकडे, सरकारने दिलेल्या उत्तरांवर विरोधी पक्षांनी असमाधान व्यक्त केले. काँग्रेस नेते तारिक अन्वर यांनी सरकारवर टीका करताना म्हटले की, पाकिस्तान मध्यस्थाची भूमिका बजावत आहे आणि आपण मात्र केवळ प्रेक्षक बनून आहोत. या विषयावर लोकसभेत नियम १९३ आणि राज्यसभेत नियम १७६ अंतर्गत सविस्तर चर्चा करण्याची मागणी विरोधकांनी केली. इस्रायल-इराण युद्धाला महिनाभराचा कालावधी उलटला असताना आता जागतिक स्तरावर शांतता प्रस्थापित करण्यासाठी महत्त्वाच्या हालचाली सुरू आहेत. पाकिस्तान, ईजिप्त आणि तुर्कीने मध्यस्थ म्हणून भूमिका निभावण्यास सुरुवात केली आहे. या तिन्ही देशांच्या परराष्ट्रमंत्र्यांनी अमेरिकेचे दूत स्टीव्ह बिटकॉफ आणि इराणचे परराष्ट्रमंत्री अब्बास अराघची यांच्याशी स्वतंत्रपणे चर्चा केली.

ईजिप्तच्या परराष्ट्रमंत्र्यांनी या संदर्भात कतारसह इतर मध्यस्थ देशांच्या प्रतिनिधींशी फोनवरून संवाद साधला. या चर्चेचा मुख्य उद्देश युद्धाचा विस्तार रोखणे आणि त्याचे जागतिक परिणाम मर्यादित करणे हा आहे. इराणने प्रादेशिक देशांच्या पुढाकाराची दखल घेतली आहे. इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाने स्पष्ट केले की, आम्ही हे युद्ध सुरू केलेले नाही, त्यामुळे शांततेच्या सर्व मागण्या आणि विनंत्या वॉशिंग्टनकडे पाठवल्या पाहिजेत. इराणचे म्हणणे आहे की, अमेरिकेने स्वत: या युद्धात थेट सहभागी होऊन चर्चेला सामोरे जावे. या युद्धामुळे इराणने होर्मुझची सामुद्रधुनी बंद केल्याने जागतिक बाजारपेठेत इंधनाचा पुरवठा विस्कळीत झाला आहे. तेल आणि वायूच्या वाढत्या किमतीमुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर चिंतेचे वातावरण आहे. भारतात गॅस सिलिंडर मिळणे दुरापास्त झाले आहे. देशांतर्गत स्वयंपाकाच्या गॅसबाबत केंद्र सरकारने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. ज्या भागात पाईपद्वारे नैसर्गिक वायू (पीएनजी) पोहोचला आहे, अशा ठिकाणच्या कुटुंबांनी जर पीएनजी कनेक्शन घेण्यास नकार दिला, तर त्यांचा एलपीजी सिलिंडरचा पुरवठा बंद केला जाणार आहे. गॅस पाईपलाईन नेटवर्कचा विस्तार करण्यासाठी आणि एकाच इंधनावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी सरकारने 'नॅचरल गॅस अँड पेट्रोलियम प्रॉडक्टस् ऑर्डर, २०२६' जारी केला आहे.

पश्चिम आशियातील युद्धजन्य परिस्थितीमुळे एलपीजीच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण झाले आहेत. या टंचाईवर मात करण्यासाठी आणि ऊर्जा सुरक्षा बळकट करण्यासाठी सरकार देशांतर्गत उत्पादित पीएनजीला प्रोत्साहन देत आहे. पीएनजी हे एलपीजीपेक्षा अधिक सोयीस्कर असून त्यात सिलिंडर बुकिंगची कटकट नसते. पाईपलाईन टाकण्याचे काम सुलभ करण्यासाठी सरकारने नियमावली कडक केली आहे. ज्या घरापर्यंत पीएनजी पोहोचला आहे, त्यांना नोटीस मिळाल्यापासून तीन महिन्यांच्या आत कनेक्शन घेणे बंधनकारक आहे. अन्यथा तीन महिन्यांनंतर त्यांचा एलपीजी पुरवठा खंडित केला जाईल. याच पार्श्वभूमीवर सरकारी तेल कंपन्यांनी बुधवारी स्पष्ट केले की, भारताकडे इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. पेट्रोल-डिझेल किंवा एलपीजीच्या तुटवड्याबाबतच्या अफवा त्यांनी फेटाळून लावल्या. देशातील सर्वांत मोठी तेल कंपनी 'इंडियन ऑईल कार्पोरेशन'ने म्हटले आहे की, पेट्रोल किंवा डिझेलचा कोणताही तुटवडा नाही. ऑनलाईन पसरणा-या अफवांमुळे अनावश्यक चिंता निर्माण होऊ शकते आणि पुरवठ्याच्या सामान्य पद्धतींमध्ये अडचणी येऊ शकतात. दरम्यान इराणने होर्मुझ सामुद्रधुनी भारतासह चीन, रशिया, कतार आणि पाकिस्तानसाठी खुली केली आहे.

मराठी साप्ताहिक समाज सत्ता के मुद्रक : राजेश सुकलाल धिवर तथा प्रकाशक : राजेश सुकलाल धिवर द्वारा के पक्ष में श्री समर्थ प्रिंटर्स, आप्पा बळवंत चौक, प्रभात थिएटर के पास, ५३५, शनिवार पेठ, पुणे ४११०३० महाराष्ट्र से मुद्रित तथा बी-२१/५०३, सेक्टर १२, प्लॉट नं. बी-१, पी.एम.आर.डी.ए., भोसरी, पिंपरी चिंचवड कार्पोरेशन, ता. हवेली, जि. पुणे ४११०१८ महाराष्ट्र से प्रकाशित, संपादक राजेश सुकलाल धिवर
Mob.: 9049940157 E-Mail- samajsattagmail.com, RNI NO. M-HM-R/2009/28514 (सर्व वादविवाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत)



# हमीपत्र दिलेल्या विकसकांनी फ्लॅटधारकांना पाणीपुरवठा करण्याची जबाबदारी पार न पाडल्यास कठोर कारवाई करणार - आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीत ज्या विकसकांनी फ्लॅटधारकांना ताबा देण्यापूर्वी पाणीपुरवठ्याची जबाबदारी स्वीकारत लेखी हमीपत्र दिले आहे, त्यांनी ती जबाबदारी काटेकोरपणे पार पाडणे बंधनकारक आहे. संबंधित जबाबदारीकडे दुर्लक्ष केल्यास किंवा पाणीपुरवठ्याचा अन्यायकारक आर्थिक भार सोसायट्यांवर टाकल्यास महानगरपालिका संबंधितांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करेल, असा स्पष्ट इशारा पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिला.

> “पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीतील गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये नागरिकांना पाणीपुरवठ्याबाबत अडचणी आल्यास महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडे तक्रार नोंदवावी. त्यानंतर नागरिकांच्या हितसंरक्षणासाठी तसेच पाणीपुरवठा व्यवस्थेत पारदर्शकता आणि उत्तरदायित्व सुनिश्चित करण्यासाठी नियमानुसार कारवाई करण्यात येईल. भामा-आसखेड योजना पूर्णतः कार्यान्वित होईपर्यंत संबंधित विकसकांवरच पाणीपुरवठ्याची जबाबदारी राहणार आहे.
>
> **-डॉ.विजय सूर्यवंशी,** आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

मुंबई उच्च न्यायालयातील १० एप्रिल २०२३ रोजीच्या जनहित याचिकेच्या अनुषंगाने पाणीपुरवठ्याबाबत स्थापन करण्यात आलेल्या समितीची बैठक नुकतीच पार पडली. यावेळी ते बोलत होते.

पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या बैठकीस पिंपरी चिंचवड महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, सह शहर अभियंता अजय सूर्यवंशी, कार्यकारी अभियंता महेश बरिदे यांच्यासह पुणे महापालिका तसेच पीएमआरडीएचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

बैठकीदरम्यान पिंपरी चिंचवड व पुणे महानगरपालिका क्षेत्रातील विविध गृहनिर्माण सोसायट्यांना भेडसावणाऱ्या पाणीटंचाईच्या समस्यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. भामा-आसखेड, आंद्रा पाणीपुरवठा योजनेसह काही महत्त्वाच्या जलपुरवठा प्रकल्पांची कामे अद्याप अपूर्ण असल्यामुळे सर्व क्षेत्रांना १०० टक्के पाणीपुरवठा करणे सध्या शक्य नसल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

यावेळी विभागीय आयुक्त डॉ. पुलकुंडवार म्हणाले की,फ्लॅट ताबा देण्यापूर्वी विकसकांकडून स्वतःच्या खर्चाने पाणीपुरवठा करण्याबाबत घेतलेल्या लेखी हमीपत्रांचे काटेकोर पालन व्हावे. ज्या ठिकाणी विकसक ही जबाबदारी टाळतात किंवा खर्च सोसायट्यांवर टाकतात, त्या प्रकरणांत संबंधित महानगरपालिकांनी कायदेशीर कारवाई करावी.

तसेच सर्व मंजूर नाहरकत प्रमाणपत्रे व विकसकांनी सादर केलेली हमीपत्रे महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे, नागरिकांना त्यांच्या सोसायटीचा संबंधित योजनेत समावेश आहे की नाही, याची माहिती पारदर्शकपणे उपलब्ध करण्याबाबत देखील बैठकीत चर्चा झाली.

---

## झोपडपट्टी सेवाकराच्या माध्यमातून १७ लाख ३५ हजार रुपयांची वसुली

- **साप्ताहिक व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही भरता येणार सेवाकर**

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महापालिकेच्या झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभागामार्फत आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये १७ एप्रिल २०२५ ते २७ मार्च २०२६ या कालावधीत १७ लाख ३५ हजार ६६० रुपयांचा झोपडपट्टी सेवाकर वसूल झाला आहे. चालू आर्थिक वर्ष ३१ मार्च २०२६ रोजी संपणार असून, तोपर्यंत नागरिकांच्या सोयीसाठी झोपडपट्टी निर्मूलन व पुनर्वसन विभागाचे कार्यालय साप्ताहिक तसेच सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही सुरू ठेवण्यात येणार आहे. सेवाकर भरणा सुलभ व्हावा आणि नागरिकांची गैरसोय टळावी यासाठी ही विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. तरी झोपडपट्टीवासीयांनी या सुविधेचा लाभ घेऊन आपला सेवाकर तात्काळ भरावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर व उपायुक्त अण्णा बोदडे यांच्या अधिपत्याखाली करदात्यांना ऑनलाइन तसेच ऑफलाइन पद्धतीने झोपडपट्टी सेवाकर भरण्याची सुविधा कार्यान्वित करण्यात आली आहे.

चालू आर्थिक वर्षातील झोपडपट्टी सेवाकर वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी विभागाकडून विशेष नियोजन करण्यात आले असून, नागरिकांना घरबसल्या ऑनलाइन स्वरूपात सेवाकर भरता येणार आहे. तसेच ३१ मार्च २०२६ पर्यंत साप्ताहिक तसेच सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही सेवाकर भरण्यासाठी विभागाचे कार्यालय सुरू राहणार आहे, अशी माहिती उपायुक्त अण्णा बोदडे यांनी दिली आहे.

**असा भरा ऑनलाइन सेवाकर**

ज्या नागरिकांना पिंपरी चिंचवड महापालिकेकडून बिल मिळाले आहे, ते नागरिक सदर बिलाचा भरणा घरबसल्या ऑनलाइन करू शकतात.

तुम्हाला मिळालेल्या बिलाच्या खालच्या उजव्या बाजूस दिलेला क्यूआर कोड (QR Code) मोबाईलद्वारे स्कॅन करा.

क्यूआर कोड स्कॅन केल्यानंतर तुमचे नाव व बिलासंबंधी इतर संबंधित माहिती स्क्रीनवर दिसेल. कृपया माहिती तपासून घ्या.

माहिती योग्य असल्याची खात्री झाल्यानंतर, त्याखालील झरू इळश्रश्र क्शीश या बटणावर क्लिक करा.

UPI / Credit Card / Debit Card / Net Banking / Digital Wallet यांपैकी कोणत्याही पर्यायाचा वापर करून बिलाचा भरणा पूर्ण करा.

## दापोडी ते मार्केट यार्ड पीएमपीएमएल बससेवेचे महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते उद्घाटन

- **विद्यार्थी, महिला व ज्येष्ठ नागरिकांसाठी नव्या बससेवेची सुविधा**

पिंपरी, दि. २७ मार्च २०२६ : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने दापोडी येथील क्र. ११ मंत्री निकेतन बस स्टॉप येथून मार्केट यार्डपर्यंत नागरिकांच्या सोयीसाठी नव्याने सुरू करण्यात आलेल्या पीएमपीएमएल बससेवेचे उद्घाटन महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आले.

दापोडी परिसरातील नागरिक, विद्यार्थी, महिला तसेच ज्येष्ठ नागरिक यांना शहरातील महत्त्वाच्या भागांशी अधिक सुलभ, सुरक्षित आणि परवडणारी प्रवास सुविधा उपलब्ध व्हावी, या उद्देशाने ही बससेवा सुरू करण्यात आली आहे. या नव्या मार्गामुळे नागरिकांच्या दैनंदिन प्रवासाला मोठी मदत होणार असून वेळ आणि खर्चाचीही बचत होणार आहे.

या उद्घाटनप्रसंगी शहर सुधारणा समिती सभापती संजय नाना काटे, नगरसदस्या स्वाती माई काटे, प्रतिक्षा लांघी-जवळकर, नगर सदस्य राजू बनसोडे, अप्पर डेपो मॅनेजर सुनिल दिवाणजी, ट्राफिक मॅनेजर यशवंत हिंगे, समन्वयक गणेश कवठेकर तसेच बसचे चालक मनीष चितळू आणि वाहक योगेश जगताप यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## खाजगी वैद्यकीय व्यावसायिक डॉक्टरांच्या अडचणी सोडविण्यासाठी महापौर रवि लांडगे यांचा पुढाकार

- **नोंदणी प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक व परिणामकारक करण्यावर भर**

**पिंपरी :** शहरातील नागरिकांना दर्जेदार व तत्पर आरोग्यसेवा मिळण्यासाठी खाजगी वैद्यकीय व्यावसायिक डॉक्टरांना सुलभ, पारदर्शक आणि सहकार्यपूर्ण प्रशासकीय व्यवस्था उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. नोंदणी प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी दूर करून अधिक परिणामकारक प्रणाली उभारण्यासाठी महानगरपालिका सकारात्मक पावले उचलेल, असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.

पिंपरी चिंचवड शहरातील खाजगी वैद्यकीय व्यावसायिक डॉक्टरांच्या प्रशासकीय व नोंदणीसंदर्भातील अडचणींवर चर्चा करण्यासाठी दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृहात महापौर रवि लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. यावेळी उपमहापौर शर्मिला बाबर, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, सभागृह नेते प्रशांत शितोळे, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे, माजी महापौर व नगरसदस्या डॉ. वैशाली घोडेकर, नगरसेवक कुशाग्र कदम, उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, सहा. आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. किशोरी नलवडे, जनसंपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच विविध डॉक्टर संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सभागृह नेते प्रशांत शितोळे म्हणाले की, शहरातील नागरिकांना प्राथमिक स्तरावर तत्पर आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यात खाजगी वैद्यकीय व्यावसायिक डॉक्टरांची भूमिका महत्त्वाची आहे. त्यामुळे त्यांच्या कामकाजातील प्रशासकीय अडचणी कमी करून नोंदणी प्रक्रिया अधिक सुलभ व पारदर्शक करणे गरजेचे आहे. डॉक्टर आणि प्रशासन यांच्यातील समन्वय अधिक बळकट करण्यासाठी महानगरपालिका प्रयत्नशील राहील.

बैठकीदरम्यान डॉक्टरांनी नोंदणी प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी, कागदपत्रांची पूर्तता, विविध विभागांशी समन्वय, प्रशासकीय विलंब तसेच तांत्रिक अडथळ्यांविषयी आपली मते मांडली. महापौर रवि लांडगे यांनी सर्व मुद्दे संयमाने ऐकून घेत प्रशासनास आवश्यक त्या सूचना देण्याचे निर्देश दिले.

नोंदणी प्रक्रिया अधिक सोपी, सुसंगत व पारदर्शक करण्याची गरज यावेळी अधोरेखित करण्यात आली. डॉक्टरांना वारंवार कार्यालयीन फेऱ्या माराव्या लागू नयेत, तसेच सर्व प्रक्रिया सुलभ पद्धतीने पूर्ण व्हावी यासाठी सकारात्मक पावले उचलण्याबाबत चर्चा झाली.

शहरातील आरोग्य व्यवस्थेत खाजगी वैद्यकीय व्यावसायिक व क्लिनिक चालक डॉक्टरांचे योगदान महत्त्वपूर्ण असून नागरिकांना प्राथमिक स्तरावर त्वरित सेवा उपलब्ध करून देण्यात त्यांची भूमिका मोठी आहे. त्यामुळे त्यांच्या कामकाजात अनावश्यक अडथळे येऊ नयेत, यासाठी महानगरपालिका सहकार्याची भूमिका घेणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

या बैठकीमुळे खाजगी वैद्यकीय व्यावसायिक डॉक्टरांच्या प्रश्नांना प्रशासकीय स्तरावर दिशा मिळणार असून, आरोग्यसेवा अधिक सक्षम व सुव्यवस्थित करण्याच्या दृष्टीने ही बैठक महत्त्वपूर्ण ठरणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

---

## खाजगी वैद्यकीय व्यावसायिक डॉक्टरांच्या अडचणी सोडविण्यासाठी महापौर रवि लांडगे यांचा पुढाकार

**पिंपरी :** शहरातील नागरिकांना दर्जेदार व तत्पर आरोग्यसेवा मिळण्यासाठी खाजगी वैद्यकीय व्यावसायिक डॉक्टरांना सुलभ, पारदर्शक आणि सहकार्यपूर्ण प्रशासकीय व्यवस्था उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. नोंदणी प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी दूर करून अधिक परिणामकारक प्रणाली उभारण्यासाठी महानगरपालिका सकारात्मक पावले उचलेल, असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.

पिंपरी चिंचवड शहरातील खाजगी वैद्यकीय व्यावसायिक डॉक्टरांच्या प्रशासकीय व नोंदणीसंदर्भातील अडचणींवर चर्चा करण्यासाठी दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृहात महापौर रवि लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. यावेळी उपमहापौर शर्मिला बाबर, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, सभागृह नेते प्रशांत शितोळे, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे, माजी महापौर व नगरसदस्या डॉ. वैशाली घोडेकर, नगरसेवक कुशाग्र कदम, उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, सहा. आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. किशोरी नलवडे, जनसंपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच विविध डॉक्टर संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समिती बैठकीत विविध विकासकामांना मान्यता

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड शहरातील विविध विकासकामांना तसेच विविध विभागांशी संबंधित विषयांना येणाऱ्या खर्चास आज पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समिती बैठकीत मान्यता देण्यात आली.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनात पार पडलेल्या स्थायी समिती सभेच्या अध्यक्षस्थानी स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे होते. यावेळी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी,स्थायी समिती सदस्य शालिनी गुजर, मनिषा चिंचवडे, संदीप कस्पटे, सारीका गायकवाड, योगिता नागरगोजे, कृष्णा सुरकुले, अर्चना करांडे, मधुरा शिंदे, बाबासाहेब त्रिभुवन, सविता आसवानी, संतोष कोकणे, संदीप वाघेरे, विकास साने, सुलभा उबाळे यांच्यासह नगरसचिव मुकेश कोळप, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर यांच्यासह महापालिका अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

बैठकीत शहरातील विविध विकासकामांशी संबंधित विषयांवर चर्चा करून त्यांना मान्यता देण्यात आली. यामध्ये पीएमपीएमएल संस्थेस महामंडळाच्या सेवकांचा सातवा वेतन आयोग फरक द्वितीय हप्ता अदा करणेसाठी अपवादात्मक बाब म्हणून सन २०२५-२६ च्या संचलन तुटीपोटीची अग्रीम रक्कम अदा करण्यासाठी मान्यता देण्यात आली. तसेच चिखली येथील ५ दशलक्ष लिटर अल्ट्राफिल्ट्रेशन प्लांटमधून प्रक्रिया केलेले सांडपाणी पुरविण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

सायकलिंग व शाश्वत दळणवळण उपक्रमांसाठी नागरी संवाद व जनसंपर्क करणेकामी सल्लागार नेमणूकीबाबत व सायकल ट्रॅक, सायनेज बोर्ड व अनुषंगिक इन्फ्रा कामासाठी बीआयसीआय संस्थेकडून अनुदान प्राप्त झाले असून विषयांकित कामाचा खर्च या अनुदानातून केला जाणार आहे. त्यानुसार फी अदा करण्यास मान्यता देण्यात आली.

प्रभाग क्र. ८ मधील बालाजीनगर येथील तसेच प्रभाग क्र. ७ मधील शांतीनगर झोपडपट्टीमधील जुने, जीर्ण मोडकळीस आलेले सामुदायिक शौचालय पाडून त्याठिकाणी नवीन सामुदायिक शौचालय उभारण्यास येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.

## प्रभू श्रीराम हे जीवनाचा आदर्श - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

■ **पश्चिम नागपूर, पोद्दारेश्वर राम मंदिराच्या शोभायात्रेला उपस्थिती**

**नागपूर :** समाजात सर्व प्रकारचे आदर्श प्रस्थापित करण्याचे कार्य प्रभू श्रीरामचंद्र यांनी केले. त्यामुळेच श्रीराम हे आपल्या सर्वांच्या जीवनाचा आदर्श असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी यांनी केले.

पश्चिम नागपूर नागरिक संघातर्फे श्रीराम नवमी निमित्त काढण्यात येणाऱ्या शोभायात्रेच्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते.

रामनगर येथील श्रीराम मंदिर परिसरात हा कार्यक्रम झाला. समाजात समता असली पाहिजे हे प्रभू श्रीरामांनी आपल्या जीवनातून दाखवून त्याच प्रकारे कार्य केल्याचे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगताना उपस्थिताना श्रीराम नवमीच्या शुभेच्छा दिल्या. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, खासदार मायाताई इवनते ,आमदार विकास ठाकरे यावेळी उपस्थित होते.

सायंकाळी मंदिरात आगमन होताच मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी प्रभू श्रीरामांच्या मूर्तीचे दर्शन घेतले. त्यानंतर अतिथींच्या हस्ते पालखी पूजन व आरती करण्यात येऊन शोभायात्रेला सुरुवात करण्यात आली.

## औषधनिर्मितीची प्रक्रिया अधिक सुरक्षित, पारदर्शक आणि वेगवान करण्यासाठी डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर वाढवणे गरजेचे

■ **पल्स परिषदेतील चर्चासत्रात सहभागी तज्ज्ञांचे मत**

**मुंबई :** औषधनिर्मितीची प्रक्रिया अधिक सुरक्षित, पारदर्शक आणि वेगवान करण्यासाठी डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्याची गरज असल्याचे मत 'नेक्स्ट जेन फार्मा ड' या चर्चासत्रात वक्त्यांनी व्यक्त केले.

बीकेसी येथील जिओ कनव्हेंशन सेंटर येथे आयोजित पल्स परिषदेत नेक्स्ट जेन फार्मा ड' 'मॅन्युफॅक्चरिंग' या विषयावरील चर्चासत्रात भविष्यकालीन औषधनिर्मितीवर सखोल चर्चा करण्यात आली. या चर्चासत्रात देश-विदेशातील औषधनिर्मिती व आरोग्य क्षेत्रातील तज्ज्ञांनी महत्त्वपूर्ण मुद्दे मांडले.



या चर्चासत्रात नियामक सुधारणा, तंत्रज्ञानाचा वाढता वापर, उद्योग-शासन सहकार्य आणि रुग्णकेंद्रित धोरणे यांमुळे भारत जागतिक फार्मा क्षेत्रात अधिक मजबूत स्थान मिळवू शकतो, असा विश्वास सर्व वक्त्यांनी व्यक्त केला.

चर्चासत्राच्या सुरुवातीला औषध उद्योगातील वेगाने होत असलेल्या बदलांचा आढावा घेण्यात आला.

या चर्चेत सेंट्रल ड्रग्ज स्टॅन्डर्ड कंट्रोल ऑर्गनायझेशन चे प्रतिनिधी डॉ. संतोष व्ही. इंद्राक्षा यांनी भारतातील औषध नियामक प्रणाली अधिक सक्षम करण्यासाठी सरकारकडून घेतल्या जाणाऱ्या उपाययोजनांची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, औषधांची गुणवत्ता, सुरक्षितता आणि प्रभावकारिता यावर काटेकोर लक्ष ठेवले जात आहे. डिजिटल ट्रॅकिंग आणि डेटा-आधारित तपासणी प्रणालीमुळे नियमन प्रक्रिया अधिक परिणामकारक होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

यानंतर स्टेलास फार्मा च्या नेहा द्विवेदी यांनी औषध उद्योगात मार्केट अॅक्सेस म्हणजेच रुग्णांपर्यंत औषधे पोहोचविण्याच्या प्रक्रियेचे महत्त्व अधोरेखित केले. संशोधनातून तयार होणारी नवी औषधे रुग्णांपर्यंत जलद आणि परवडणाऱ्या दरात पोहोचण्यासाठी उद्योग आणि शासन यांच्यातील सहकार्य आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.



## खत उपलब्धतेसाठी सातत्याने आढावा सुरु - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

■ **केंद्राच्या प्रभावी नेतृत्वामुळे संकटातही देश स्थिर; महाराष्ट्र शासन केंद्राच्या सूचनांचे पूर्णपणे पालन करेल**

**मुंबई :** जागतिक स्तरावर निर्माण झालेल्या संकटाच्या पार्श्वभूमीवर भारताने संतुलित आणि प्रभावी धोरण राबवले असून, यामध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारची महत्वाची भूमिका आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. केंद्र शासनाच्या निर्देशानुसार या संकटकाळात महाराष्ट्रात पीएनजी (पाईप्ड पद्धतीने वितरण) वितरणाला गती देण्यात येत असून खतांच्या उपलब्धतेसाठी सातत्याने आढावा घेतला जात असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित विविध राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची बैठक दूरदृश्य प्रणालीद्वारे घेण्यात आली. या बैठकीत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेही सहभागी झाले होते. त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी महाराष्ट्राच्या वतीने मुद्दे मांडले. यावेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय मंत्रिमंडळ सचिव तसेच विविध राज्यांचे मुख्यमंत्री आणि केंद्रशासित प्रदेशांचे नायब राज्यपाल उपस्थित होते. मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव डॉ.श्रीकर परदेशी या बैठकीला उपस्थित होते.

सध्याच्या कठीण काळात पश्चिम आशिया खंडातील युद्ध परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या जागतिक संकट काळात देशातील नागरिकांवर प्रतिकूल परिणाम होऊ नये, यासाठी घेतलेल्या निर्णयांबद्दल मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे आभार मानले.

सध्याच्या काळात महाराष्ट्र शासनाने राबविलेल्या उपाययोजनांची माहिती देताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्यात खतांची पुरेशी उपलब्धता असून त्याचा सातत्याने आढावा घेतला जात आहे. आगामी खरीप हंगामात शेतकऱ्यांना कोणतीही अडचण येणार नाही, यासाठी आवश्यक ती खबरदारी घेतली जात आहे. याचबरोबर काळाबाजार व साठेबाजी रोखण्यासाठी कठोर कारवाई करण्यात येत आहे. शेतीशी संबंधित बाबी 'अॅग्रीस्टॅक' प्रणालीशी जोडण्याचे काम सुरू असून त्यामुळे गैरप्रकारांना आळा बसणार आहे. परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्यासाठी सातत्याने बैठका घेतल्या जात असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. केंद्र सरकारच्या सर्व सूचनांचे राज्य शासन पूर्णपणे पालन करेल, असे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पीएनजी (पाईप्ड नॅचरल गॅस) वितरणाला गती देण्यात आली असून 'ईज ऑफ डुइंग बिझनेस'च्या माध्यमातून प्रक्रिया सुलभ केली जात आहे. या संकटाकाळात केंद्र शासनाच्या नेतृत्वाखाली राज्य शासन आपली जबाबदारी प्रभावीपणे पार पाडेल, असा विश्वासही यांनी व्यक्त केला.

## महसूल विभागात १५ बडे अधिकारी सक्तीच्या रजेवर

**पुणे -** जिल्ह्यात जमीन महसूल अभिलेखातील कलम १५५ चा गैरवापर करून सातबारा उताऱ्यावरील नावात, क्षेत्र आणि भोगवटादार वर्ग यामध्ये बेकायदेशीर बदल केल्याबद्दल सरकारने १५ बड्या अधिकाऱ्यांना तात्काळ सक्तीच्या रजेवर पाठविण्याचे आदेश दिले आहेत. यामध्ये तहसीलदार , उपजिल्हाधिकारी, तलाठी, मंडल अधिकाऱ्यांचा समावेश आहे. सातबारा उताऱ्याचे संगणकीकरण करताना झालेल्या तांत्रिक चुका दुरुस्त करण्यासाठी तहसीलदारांना कलम १५५ चे अधिकार दिले होते.

याचा आधार घेऊन काही अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक जमिनीचे मालकी हक्क बदलणे, शेतीचा वर्ग बदलणे आणि क्षेत्रात फेरफार करणे यांसारखे गैरप्रकार केल्याच्या तक्रारी आल्या होत्या. याची दखल घेऊन राज्य शासनाने नाशिकचे विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांच्या अध्यक्षतेखाली विशेष चौकशी समिती स्थापन केली. समितीने एकूण २,३३७ प्रकरणांची सूक्ष्म तपासणी केली. त्यापैकी १३ प्रकरणे अ वर्गवारीत (अतिगंभीर) आढळली.

यात कायद्याचा जाणीवपूर्वक भंग करून खासगी हितासाठी सरकारी दप्तरात बेकायदेशीर बदल केल्याचा ठपका समितीने ठेवला. यावरून अर्थसंकल्पीय अधिवेशनात लोकप्रतिनिधींनी लक्षवेधी सूचना मांडली होती. यावरील चर्चेवेळी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांना तात्काळ सक्तीच्या रजेवर पाठविण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार महसूल विभागाच्या कक्ष अधिकारी श्रद्धा मगर यांनी आदेश दिले.

हे अधिकारी सक्तीच्या रजेवर उपजिल्हाधिकारी गीता गायकवाड, उपजिल्हाधिकारी संजय पाटील, उपजिल्हाधिकारी श्रीकांत पाटील, उपजिल्हाधिकारी मधुसुदन बर्गे, तहसिलदार ज्योती देवरे, तहसिलदार रविंद्र सबनीस, मंडल अधिकारी व्यंकटेश भोसले, महसूल सहाय्यक प्रल्हाद पाटील, मंडल अधिकारी मलाप्पा ढाणे,, मंडल अधिकारी मारुती चोरमले, तलाठी अश्विनी गोरे, तलाठी सुजाता रच्वेवार, महसूल सहाय्यक श्रीकांत कुलकर्णी, सहाय्यक महसूल अधिकारी सुरेश जगताप, तलाठी ज्ञानेश्वर भराटे.

## पुण्यात पेट्रोल-डिझेलचा तुटवडा?

■ **पंपांवर लांबच लांब रांगा**

**पुणे -** जिल्ह्यात पेट्रोल-डिझेलच्या टंचाईच्या अफवा सोशल मिडियावरून पसरल्याने पेट्रोल पंपांवर अनावश्यक गर्दी होत असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. शहर आणि ग्रामीण भागात काही पेट्रोल पंप बंद असल्याने अफवांमध्ये भर पडली आहे. मात्र, पेट्रोल आणि डिझेलचा साठा सरप्लस असून, कोणतीही टंचाई नसल्याचे ऑल इंडिया पेट्रोल-डिझेल असोसिएशनचे सदस्य अली दारुवाला यांनी स्पष्ट केले आहे.

६५ लाख सिलिंडरचा साठा असलेले चीनला निघालेले एक जहाज चेन्नईला उतरले आहे. येत्या काही दिवसांत भारत सरकारने सांगितल्याप्रमाणे एलपीजी, सीएनजी, एलएनजी सर्व भेटणार आहे. देशाकडे पेट्रोल आणि डिझेल सरप्लस आहे, टंचाई कोठेच नाही. फक्त वाहतूक चार्ज वाढल्याने शासनाला एका लिटरमागे ५० रुपये तोटा सहन करावा लागत आहे.

ग्रामीण भागात पेट्रोल पंप बंद आहेत. मात्र, त्यामागे टंचाई हे कारण नाही. पेट्रोलियम कंपन्यांनी क्रेडिट देणे बंद केले आहे. त्यांच्याकडून आठवडा ते पंधरा दिवस क्रेडिट देणे सुरू होते. त्यांना मागील उधारी क्लिअर करण्यास आणि आज लागणाऱ्या मालाचे पैसे आगाऊ देण्यास सांगण्यात आले आहे. पेट्रोल पंप काही हजार लिटर पेट्रोल घेतात. त्यामुळे त्यांना एवढी रक्कम आगाऊ देणे शक्य नाही, त्यातच रामनवमीमुळे काही बँका बंद आहेत. याचा परिणाम म्हणून काही पंप बंद आहेत.

टिंगरेनगर येथील श्री साई कृपा सर्व्हिस पेट्रोलपंपाचे मालक अजय सावंत यांनी सांगितले, की पेट्रोलियम कंपन्या आम्हाला क्रेडिट देत होत्या. त्यामुळे आम्ही उद्योग, व्यवसाय, मॉल, थिएटर आदींसारख्या ग्राहकांना क्रेडिटवर बल्कने माल देऊ शकत होतो. आता आम्हाला क्रेडिट बंद झाल्याने आमच्या ग्राहकांनाही उधारीवर माल देऊ शकत नाही

## फ्लॅट आणि गोडाऊनचे आमिष; ६० लाखांची फसवणूक, दत्तवाडीतील बिल्डरवर गुन्हा

**पुणे :** फ्लॅट आणि गोडाऊन देण्याचे आमिष दाखवत तब्बल ६० लाखांहून अधिक रकमेची फसवणूक केल्याप्रकरणी दत्तवाडी येथील बिल्डर हुसेन अहमद पठाण यांच्याविरुद्ध खडक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे शहरातील रिअल इस्टेट व्यवहारांमधील गैरप्रकार पुन्हा एकदा समोर आले आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हुसेन पठाण हे अम्मार डेव्हलपर्स अॅण्ड बिल्डर्स या कंपनीचे मालक असून, त्यांनी गणेश पेठ परिसरातील 'अमान प्लाझा' या प्रकल्पामध्ये फ्लॅट आणि गोडाऊन देण्याचे आश्वासन देत फिर्यादीकडून मोठी रक्कम उकळल्याचा आरोप आहे.

या प्रकरणी आश्विनी दिलीप सारंदा (३१, रा. गणेश पेठ, पुणे) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार, १ मार्च २०१६ ते ८ मार्च २०१६ या कालावधीत आरोपीने फ्लॅट क्रमांक १ (सुमारे ६०० चौ. फूट) आणि तळमजल्यावरील गोडाऊन क्रमांक १ (सुमारे १९० चौ. फूट) विक्रीसाठी व्यवहार निश्चित केला होता.

यासाठी फ्लॅटसाठी सुमारे ३८.४० लाख रुपये आणि गोडाऊनसाठी २१.८५ लाख रुपये, तसेच इतर शुल्क मिळून एकूण ६० लाखांहून अधिक रक्कम स्वीकारण्यात आली. याबाबत २०१६ मध्ये नोटरी करारनामा तसेच नोंदणीकृत करार करण्यात आला होता.

## 'बॉटॅनिकल गार्डन'च्या जमिनीचा वाद मिटणार?

**पुणे -** मुंढवा येथील भारतीय वनस्पती सर्वेक्षण संस्थेकडे (बॉटॅनिकल गार्डन) असलेली जागा याच संस्थेला कायमस्वरूपी कब्जेहक्काने देण्याची शिफारस खारगे समितीने जिल्हाधिकाऱ्यांना केली आहे. मुंढवा येथील सर्वे क्र. ८८/१ ते ८८/२६ ही जमीन राज्य शासनाने काही अटींवर काहींना कसण्यासाठी दिली होती. शेतसारा न भरल्यामुळे १९५५ मध्ये ही जमिनी सरकारकडून खालसा करण्यात आली.

१९७७ मध्ये ही जमिनी १५ वर्षांच्या भाडेपट्ट्याने केंद्र सरकारच्या भारतीय वनस्पती सर्वेक्षण संस्थेला देण्यात आली. भाडेपट्ट्याची मुदत संपल्यानंतर १९८८ मध्ये पुन्हा ५० वर्षांच्या भाडेकराराने जमीन देण्यात आली. या जागेचा सहा वर्षांपूर्वी सातबारा उतारा बंद मालमत्ता पत्रक झाले. या बंद झालेल्या सातबारा उताऱ्यावर कब्जेदार, मालकी हक्क सदरी मुंबई सरकार, अशी नोंद आहे.

असे असतानाही ही जमिनी शीतल तेजवानी यांनी कुलमुख्यातरपत्र घेऊन ती अमेडिया एंटरप्रायझेस एलएलपी कंपनीचे भागधारक दिग्विजय पाटील यांना विकली. तर सह दुय्यम निबंधक रवींद्र तारू यांनी त्याचा खरेदी दस्त नोंदविला. हे प्रकरण उघडकीस आल्यानंतर राज्य शासनाने महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीची स्थापना केली.

समितीने दिलेल्या अहवालात, ही जमीन भारतीय वनस्पती सर्वेक्षण संस्थेच्या ताब्यात असून येथे दुर्मिळ व लुप्त होणाऱ्या प्रादेशिक वनस्पतींच्या प्रजातींचे जतन, संवर्धन, संशोधन असे महत्त्वाचे प्रकल्प राबविले जात आहेत. या प्रकल्पाचे बळकटीकरण करणे हा राष्ट्रीय स्तरावरील प्राधान्याचा विषय आहे.

हे अत्यंत महत्त्वाचे व मौलिक स्वरूपाचे काम असल्याने ही जागा कायमस्वरूपी भारतीय वनस्पती सर्वेक्षण संस्थेला कब्जेहक्काने देण्याबाबत समितीने शिफारस केली आहे. याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांनी सादर करावा. राज्य शासनाने त्यास मान्यता देऊन ही जागा कायमस्वरूपी कब्जेहक्काने संस्थेला देण्याची कारवाई तत्काळ करावी, अशी शिफारस या अहवालात केलेली आहे.

## केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांची महाराष्ट्राच्या कृषी मंत्र्यांनी घेतली भेट

■ **राज्यातील कृषी योजनांचा घेतला आढावा**

**नवी दिल्ली -** केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण आणि ग्रामीण विकास मंत्री श्री. शिवराज सिंह चौहान यांची नवी दिल्ली येथे महाराष्ट्राचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज भेट घेतली. या बैठकीत महाराष्ट्रातील कृषी क्षेत्रातील प्रगती, प्रलंबित प्रश्न आणि शेतकऱ्यांच्या हिताच्या विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

या बैठकीत कृषी मंत्री श्री. भरणे यांनी राज्यातील कृषी यांत्रिकीकरण आणि ठिबक सिंचन योजनांना गती देण्यासाठी अतिरिक्त निधी उपलब्ध करून देण्याची विनंती केली.तसेच कोकण आणि किनारपट्टीच्या भागात अवकाळी पावसामुळे आंबा व काजू पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या नुकसानीची माहिती श्री. भरणे यांनी दिली. या नुकसानीची केंद्र सरकारच्या पथकाने पाहणी केली असल्याचे कृषी मंत्रालयाने सांगितले.

राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी 'पंतप्रधान पीक विमा योजनेचा' जास्तीत जास्त लाभ मिळवून द्यावा, असे निर्देश श्री. शिवराज सिंह चौहान यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.शेतकऱ्यांच्या समस्यांच्या जलद निवारणासाठी ५२ विशेष पथके स्थापन करण्यात आली असून त्यांच्या कामाचा नियमित आढावा घेतला जात आहे.